**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ११**
**सभावृत्तांत**

**दिनांक - ०१/०२/२०१९** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक ०१/०२/२०१९** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे – **अध्यक्षा**

२) मा.विकास हरिश्चंद्र डोळस

३) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू

४) मा.गायकवाड निर्मला मनोज

५) मा.प्रियांका बारसे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी, श्री. एस. एच. भोसले- प्र.प्रशासन अधिकारी, श्री.प्रविण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.संजय घुबे- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्रीम.शिनकर पी.पी.उपअभियंता (स्थापत्य), श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.विजय जाधव-उपअभियंता (स्थापत्य/उद्यान), श्री.वहिकर एस.एस.-उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.गनबोटे ए.पी. - क.अभियंता (स्थापत्य) श्रीम.पोतदार व्ही.एच. - क.अभियंता (स्थापत्य), श्री.कातोरे पी.बी. - कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री.पवार व्ही.एस.- क.अभियंता(विद्युत), श्री. श्री.पांचाळ बी.के.क.अभियंता, श्री.सुनिल बेळगांवकर. क.अभियंता.(पाणीपुरवठा), श्री.विनय जगताप-स्थापत्य असि. ,श्री.प्र.रा.तावरे – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ए.व्ही.गुमास्ते – प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री श्री.कुतवळ एस.यु.-क.अभियंता, (ज.नि.), श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.गायकवाड पी.आर.-मुख्याध्यापक- माध्यमिक विद्यालय, लांडेवाडी, श्री.साळुंके जे.जी.मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, भोसरी –पुणे ३९. श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक, ------

**मा.अध्यक्षा –** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

**सुचक** –मा.लक्ष्मण उंडे **अनुमोदक –** मा.विकास डोळस

आजची इ प्रभाग समितीची सभा गणसंख्येअभावी बुधवार दि.०६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

**-------**

**मा.अध्यक्षा** - इ प्रभाग समितीची सभा गणसंख्येअभावी बुधवार दि.०६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

सही/-

-----

अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ११**
**सभावृत्तांत**
**(दिनांक - ०१/०२/२०१९ रोजीची तहकूब सभा)**

**दिनांक - ०६/०२/२०१९** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ०१/०२/२०१९** रोजी **सकाळी ११. ०० वा.ची तहकूब सभा दिनांक ०६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे – **अध्यक्षा**
२) मा.सुवर्णा विकास बुर्डे
३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४) मा.श्री उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा.गायकवाड निर्मला मनोज
६) मा.बारसे प्रियांका प्रविण
७) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
८) मा.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य
९) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री. एस. एच. भोसले- प्र.प्रशासन अधिकारी, श्री.प्रविण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.संजय घुबे- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.लांडे बी.पी.-उपअभियंता (विद्युत), श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), ), श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.विजय जाधव- उपअभियंता (स्थापत्य/उद्यान), श्री.वहिकर एस.एस.- उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.कातोरे पी.बी. - कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री.निखील फेंडर- क.अभि. स्थापत्य उद्यान, श्री. व्ही. एम. ताकवले - कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री.राऊत व्ही.एस.क.अ.- .(पाणीपुरवठा), श्री.विनय जगताप – स्था.अ.सं., श्री.ए.व्ही.गुमास्ते – प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.कोतकर पी.- क.अभियंता, (पाणीपुरवठा), श्री.एच.जे. म्हेत्रे – उद्यान सहाय्यक, श्री.संदिप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), (ज.नि.), श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), , श्री.व्ही.एल. सावंत – सहा.शिक्षक माध्य. विद्यालय लांडेवाडी,

------

**मा.अध्यक्षा –** सर्व सन्मा.सदस्य व सर्व सन्मा.अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

--------

अ) दिनांक ०४/०१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक - **३५** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०६/०२/२०१९**

सूचक- मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक–मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – क्र.श्रीभैवा/०७/कावि/०२/२०१९, दिनांक २४/०१/२०१९श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी. कोटेशन नोटीस क्र.२ सन २०१८-२०१९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता नव्याने पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी यांना महाराष्ट्र शासनाचा “ब” दर्जा प्राप्त असून त्यांना अनुदान प्राप्त होत असल्याने दरवर्षी पुस्तके/ग्रंथ खरेदी करणे आवश्यक आहे. वाचकांच्या व सभासदांच्या आवडीनुसार कथा, कांदब-या, ललितलेख, ऐतिहासिक, विनोदी, आरोग्य, काव्य, धार्मिक विषयाच्या पुस्तकांची किंवा ग्रंथांची खरेदी करण्यात येते. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरीता **“पुस्तके व नियतकालिके खरेदी”** या लेखाशिर्षावर सुधारीत तरतूद र.रु.३,००,०००/- इतकी रक्कम असून त्यातून श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे व नियतकालिके खरेदी करण्यात येतात. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता कोटेशन नोटीस क्र.२ जा.क्र. भैसावा/७/कावि/६२/२०१८, दिनांक१२/१२/२०१८ अन्वये कोटेशन नोटीस म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सोबतचे प्रपत्र “अ” नुसार दरपत्रक मागविले असता ३ पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झाले असून अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांनी १६.५० % सुट दिली आहे. त्यानुसार अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांचेकडून अटी व शर्तीनुसार श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरीता ७०० पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी १६.५० % सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेली आहे. सदरचा खर्च **“पुस्तके व नियतकालिके खरेदी”** या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. तरी अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७. यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता ७०० पुस्तके/ग्रंथांच्या र.रु. १,२५,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख पंचवीस हजार फक्त) च्या एकूण किंमतीवर १६.५० % सुट देऊन येणा-या किंमतीची पुस्तके खरेदी करावयाच्या खर्चास मा.प्रभाग समितीची मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - **३६** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०२/०२/२०१९**

सूचक- मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक–मा.विकास डोळस

संदर्भ – क्र.इक्षेका/भोस्पपकें/कावि/४/२०१९ दिनांक-२४/०१/२०१९ भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र कोटेशन नोटीस क्र.३ सन २०१८-२०१९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र भोसरीकरीता नव्याने पुस्तके खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी येथील विद्यार्थ्यांना MPSC, UPSC तसेच विविध स्पर्धा परीक्षांना उपयुक्त अशी व विद्यार्थ्यांनी मागणी केलेली १०७ पुस्तके खरेदी करणेत येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने प्रशासनाकडील जा.क्र. प्रशा/०२/कावि/७१७/२०१७ दिनांक २९/०९/ २०१७ अन्वये सार्वजनिक वाचनालये व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार भोसरी येथील श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र इ क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणेबाबतचा आदेश निर्गत करण्यात आला आहे. त्यानुसार इ क्षेत्रीय कार्यालया मार्फत सार्वजनिक वाचनालयाकरीता सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरीता **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षावर सुधारीत तरतूद र.रु.३,००,०००/- इतकी रक्कम असून त्यातून श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र करीता ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे व नियतकालिके खरेदी करण्यात येतात. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र भोसरीकरीता कोटेशन नोटीस क्र.३ जा.क्र. इक्षेका/ भोस्पपकें/कावि/ ६४/२०१८, दिनांक १२/१२/२०१८ अन्वये कोटेशन नोटीस म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सोबतचे प्रपत्र "अ" नुसार दरपत्रक मागविले असता ३ पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झाले असून अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांनी १७ % सुट दिली आहे. त्यानुसार अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांचेकडून अटी व शर्तीनुसार भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी करीता १०७ पुस्तके खरेदी करणेकामी १७ % सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेले आहे. सदरचा खर्च **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे . तरी अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७. यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी करीता १०७ पुस्तकांच्या र.रु ४७,५००/- ( अक्षरी र.रु.सत्तेचाळीस हजार पाचशे फक्त) च्या एकूण किंमतीवर १७ % सुट देऊन येणा-या किंमतीची पुस्तके खरेदी करावयाच्या खर्चास मा.प्रभाग समितीची मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

**विषय क्रमांक -१**.टॉयलेट बांधण्याबाबततमा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे
दिनांक ०४/०१/२०१९ चे पत्र.

-------

अ) दिनांक ०४/०१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १०)
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-----**

ठराव क्रमांक - **३७** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०१/०२/२०१९**

सूचक- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक–मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ – टॉयलेट बांधण्याबाबत. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे दि. ३१/०१/२०१९ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये इ प्रभाग क्रमांक ७ मधील जिजाऊ उड्डाणखाली टॉयलेट व मुतारी बांधून मिळणे अत्यंत गरजेचे आहे. नागरीकांची सोय होईल व पुलाखालील पिलर भोवती होणारी घाण व दुर्गंधीपासून सुटका मिळेल खाली नमूद केलेल्या ठिकाणी बांधणेबाबत. १) शिवाजी महाराज पुतळासमोर २) चांदणी चौक मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

.

**मा. अध्यक्षा -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

-------

सही/-<br>अध्यक्षा<br>इ प्रभाग समिती<br>भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९<br>क्र-इक्षेका/कावि/४/५७/२०१९<br>दिनांक- १८/०१/२०१९.

**सही / -**<br>प्रशासन अधिकारी तथा सचिव<br>इ क्षेत्रीय कार्यालय<br>भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

-------

**शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ सकाळी ११.०० वा. ची इ प्रभाग समितीची तहकूब सभा सभा बुधवार दिनांक ६/२/२०१९ झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे –** अमृत योजने द्वारे पाणीपुरवठा व ड्रेनेजचे काम चालू आहे. मेन पाईप लाईन आहे त्या ठिकाणी हात लावला नाही. लोखंडी पाईपांचा चुरा झालेला आहे. दुर्गा कॉलनी या ठिकाणी पाणी चालू केले आहे. प्रभागातील लोकसंख्या लक्षात घेता पाईप लाईन बदलली पाहिजे.

**श्री.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा),** नवीन पाईप लाईन टाकणेबाबत चर्चा करुन मिटींग घेणार आहे.

**मा.प्रियांका बारसे –** माझे प्रभागातील कामे जोरात चालू आहेत. त्याबद्दल धन्यवाद. परंतू जे काम झालेले आहे ते मटेरियल तसेच पडलेले आहे. बरेच दिवस ती घाण तशीच पडलेली आहे. नळकनेक्शन अधिकृत/अनाधिकृत आहे का हे पाहिले पाहिजे भाडेकरु व मालक यांना पाणी मिळाले पाहिजे.

**मा.श्री.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)** – शास्तीकर भरल्या शिवाय नळकनेक्शन अधिकृत करीत नाही. नागरीकांनी पैसे भरल्याची पावती किंवा स्वत:चे नावाचे पॅनकार्ड आवश्यक आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे** – विश्वकर्मा, काटे कॉलनी मध्ये ड्रेनेजचा खूप प्रोब्लेम आहे. ड्रेनेजच्या मोठया लाईनची गरज आहे. अजून लोकवस्ती वाढणार आहे. त्यामुळे ड्रेनेजलाईनचे काम करणे आवश्यक आहे.

**मा.अजित बुर्डे – स्विकृत सदस्य** – च-होलीमध्ये डी.पी.च्या बाजूला ड्रेनेज तुंबलेले आहे.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे –** दिघीरोड गुळवेवस्ती येथे पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात जात असून अतिशय घाण पाणी येत आहे. त्यामुळे ड्रेनेज लाईनची आवश्यकता आहे. संतोषी अपार्टमेंटमध्ये सुध्दा पाण्याचा प्रोब्लेम आहे.

**मा.प्रियांका बारसे** – गंगोत्रीपार्कमध्ये महिलांसाठी व्यायाम करण्याचे साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे. गार्डनमध्ये (ओपनजीम) करणे आवश्यक आहे.

**मा. विकास डोळस** – दिघीमधील पाण्याची टाकी पाडणेत यावी.

**मा.श्री.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)** – पाण्याची टाकी पाडण्याबाबतची व्यवस्था केलेली आहे. लवकरच ते काम करण्यात येईल.

**मा.निर्मला गायकवाड** – दिघीमधील आदर्शनगरमध्ये पाण्याची पाईपलाईन टाकण्यात यावी. कॉलनी नं.१. महादेवनगरचे काम झाले होते त्या वेळेस मोठी पाईप लाईन टाकली होती. ती पाईप लाईन कुठे टाकली. तसेच गणेशनगरची पाईपलाईन खालीवर झालेली आहे. त्यामुळे पाणी व्यवस्थि त मि ळत नाही.

**मा.श्री.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) –** त्या ठिकाणी केबल आहे. ड्रेनेजचे काम झालेले आहे. त्यामुळे ते काम कसे करता येईल हे पाहिले पाहिजे. गणेशनगरमधील काम झालेले आहे. आता थोडयाच ठिकाणची कामे राहिली आहे. फक्त दहा टक्के कामे राहिले आहे.

**मा.प्रियांका बारसे –** लोखंडीबार लावल्याबद्दल धन्यवाद. आदर्शनगरमध्ये शौचालय बांधून झालेले आहे परंतू त्याठिकाणी दरवाजे बसविले नाही. वापरासाठी पाणी नाही.

**श्री.निखील फेंडर – क.अभियंता, (स्थापत्य उद्यान)** - पुढच्या टेंडरला काम करण्यात येईल.

**मा.निर्मला गायकवाड -** दिघीरस्ता लवकरात लवकर सुस्थितीत करण्यात यावा.

**मा.अजित बुर्डे – स्विकृत सदस्य -** कलर ब्लॉकचे काम इतर प्रभागात झालेले आहे. च-होली येथे ते काम करण्यात यावे.

**मा.घुबे –उपअभियंता (स्थापत्य)** – रस्ताची सर्व कामे करुन देण्यात येईल.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे**- – सर्व प्रभागात फिरत जाणे. रस्त्याची कामे कुठे कामे झाली नाहीत, पाणी नाही, लाईट नाही, ड्रेनेज व्यवस्थित नाही. या सर्व गोष्टी सर्व प्रभागातून फिरुन पाहिल्या पाहिजे. अपुर्ण कामे पुर्ण करणे आवश्यक आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे –** काटे कॉलनीमधील नागरीक लाईट बील भरतात. लाईटचे बिल प्रत्येक घरातून गोळा केले जाते. लाईटचे बील आळंदीला आहे ते भोसरी येथे घेण्यात यावे. सहा महिन्यापासून लाईट बिलाबाबत पाठपुरावा करीत आहे. पत्र सुध्दा दिलेले आहे. त्यामुळे लाईटबिलाचे काम भोसरीला करावे.

**मा.संतोष लोंढे** – शांतीनगर परिसरात सहा दिवसापासून पाण्याचा प्रॉब्लेम आहे. या ठिकाणी खूपच प्रॉब्लेम आहेत. एकएक पाण्याचे जार मागविले जाते. ५,६ दिवस पाण्याची समस्या होती.

**मा.श्री.पवार-**कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) – पाण्याच्या टाक्या साफ केल्या होत्या. टाक्यांमध्ये पाणी कमी प्रमाणात असल्यामुळे पिण्याचे पाणी कमी वेळ सोडले असेल.

**मा.संतोष लोंढे –** पिण्याच्या पाणी घाण येते. त्याठिकाणी जो ठेकेदार काम करतो तेथील पाण्याची पाईप लाईनमध्ये घाण आहे हे त्यांनी पाहिले पाहिजे. सहा महिन्यापासून नागरीकांना पाण्याचा त्रास होत आहे. ६,७ दिवस किती पाईप लाईन फुटली ती पाहिली का? जो कोणी संबंधीत कर्मचारी असेल त्यांना निलंबित करा. टाक्या साफ केल्या होत्या त्यानंतर दुस-या दिवशी पाणीच नाही. प्रश्नाचे उत्तर चुकीचे देतात. दुस-या दिवशी सुध्दा फोनसुध्दा केला होता. पाणी व लाईटचा नागरीकांना अत्यंत उपयोग होत असलेने ते काम केले पाहिजे. ठेकेदाराची माणसे सध्या वेळेच बंधन पाळत नाही. सगळीकडे ७.०० वा. पाणी सोडतात. केंव्हाही पाणी सोडतात. ठेकेदारांचे कर्मचारी वेळेवर काम करीत नसतील तर त्यांना घेऊ नका. नवीन टाकीची मागणी केलेली आहे. जागा सुविलेली आहे. लांडेवाडी येथील जागा आपलेकडे उपलब्ध आहे.

अमृत योजनेचे जे काम आहे ते करा. एजन्सी करुन घ्या. सर्व नगरसेवकांना कल्पना दिलेली आहे का? एजन्सीचं लोक जाऊन मनमानी कारभार करीत आहेत. त्यांचेकडून किती टक्के काम झालेले आहे? प्रत्येक अधिकारी यांनी ज्या ठिकाणचे ठेकेदार कामे व्यवस्थित करीत नाही त्यांचेवर कारवाई करणे गरजेचे आहे. सगळयांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. लोकांनी अनाधिकृत नळ कनेक्शन घेतले आहे. त्या ठिकाणी प्रशासनाने अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत केले पाहिजे. विदर्भ,मराठवाडा या ठिकाणी लोकांना पाणी नाही. प्रभाग क्रमांक ७ मध्ये कधी काम केले नाही. अमृत योजनेमध्ये काय कामे केली आहे? सगळी चुकीची कामे करीत आहात. मीटर निरीक्षक व बील वाटप करणारे यांनी एकत्र येऊन पाण्याची बीले पाहिली पाहिजे. बिलाच्या बाबतीत अतिशय लापरवाई होत आहे. मीटर रिडींग प्रमाणे बिले येत नाही. याबाबत स्वत: दक्षता घेण्यात यावी.

स्मशानभूमी येथे सोलर सिस्टीम बसवा. त्या ठिकाणी लाईट,पाणी असले पाहिजे. प्रवचनकार प्रवचन करीत असतात. तेंव्हा लाईट असली पाहिजे. त्या ठिकाणी गरम पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. स्मशानभूमीमध्ये स्पीकर सेट असावेत. स्मशानभूमीमध्ये दुखवटयाचे कार्यक्रम होत असतात. त्यामुळे स्मशानभूमीमध्ये दशक्रिया घाट, स्मशानघाट येथे सुरक्षा रक्षक असावेत. तेथे सर्व सोईसुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. स्मशानभूमीतील मधला स्पेस आहे तेथे डिवाडर करा. त्या ठिकाणी लोकांचे अपघात वाढले आहे. जागा दाखविली आहे. पुणे-नाशिक रोडजवळ विसावा ओटा असले पाहिजे. त्या ठिकाणी अंत्यविधीच्या गाडया येतात. गोल सर्कलची मागणी केली आहे. वाहतुकीची अडचण होत आहे त्यामुळे साध्या विटांनी बांधकाम करा.

**मा.प्रियांका बारसे –** प्रियदर्शनी शाळेजवळ डांबरीकरण करा. अडचणीची जागा आहे. डिवायडर केला तर बरे होईल.

**श्री.पांचाळ क.अभियंता (स्थापत्य)** – डिवायरचे काम करुन देतो.

**मा.प्रियांका बारसे –** सखुबाई गवळी उद्यान येथे हॉल करा. रस्त्याचे सपाटीकरण करा. सुरक्षा कर्मचा-यांची नेमणूक करा.

**मा.सभापती सौ.भिमाताई पोपट फुगे –** राडारोडा उचलून टाका. स्थापत्य जलनि:सारण विभागाने ते काम करा.

**मा.संतोष लोंढे –** प्रभाग क्रमांक ७ मध्ये ४ नगरसेवकांना एकच जे.इ. आहे. सपोर्ट करण्यासाठी कर्मचारी पाहिजे. एजन्सीचे लोक यांचेकडून गाळ काढला जात नाही. गटर,ड्रेनेज ही वेगळी कामे केली पाहिजे. ज्याठिकाणी टाक्याचा प्रॉब्लेम आहे त्या ठिकाणी मोठी पाईप लाईन टाकली पाहिजे. आरोग्य विभागाकडून खूप हलगर्जीपणा होत आहे. त्यांचेवर कारवाई केली पाहिजे. कच-याच्या गाडया वेळेवर येत नाही. त्यामुळे कचरा साचला जातो. त्याबाबतची व्यवस्था केली पाहिजे. गाडी बाहेर ज्या कच-याच्या पिशव्या असतात त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. नाले स्वच्छ करीत नाहीत. गव्हाणेवस्तीमधील टॉयलेटचे सेफ्टीटँक साफ केले पाहिजे.

**मा.अध्यक्षा** - यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

-------